किफौ.अर्ज क्र. ८७/२०२३
किशोर जुवारे वि. ग्रा.पं. करंजी
CNR No. MHCH09-000601-2023

# नि.क्र. १ वरील आदेश

( दिनांक १८.०९.२०२३ रोजी पारित)

१. सदरचा अर्ज अर्जदाराने त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, करंजी, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर येथील कार्यालयात घेण्याचा आदेश मिळण्याकरीता केला आहे. अर्जदाराने अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदाराचा जन्म दिनांक १९/०५/१९८७ रोजी मौजा करंजी, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपुर येथे झाला. अर्जदाराचे आई वडीलांना जन्मनोंदणीच्या महत्वाबाबत जाणीव न झाल्याने तसेच अर्जदार व त्याचे आई वडील यांनी जन्माची नोंद माहितीअभावी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये केली नाही. तसेच त्यासाठी गावातील सुशिक्षित लोकांनी व सदस्यांनी त्याची कल्पना सुद्धा अर्जदाराला अथवा त्यांच्या आई-वडिलांना दिली नाही. अर्जदाराला त्यांच्या मुलांच्या दस्ताऐवजाकरीता, नातवंडाच्या शालेय कामाकासाठी तसेच काही भविष्यातील महत्वाच्या कामाकरीता कागदपत्रे काढण्याकरीता जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता भासली. त्यामुळे अर्जदाराच्या जन्माची नोंद रजिस्टरमध्ये घेण्याबाबत आदेश होण्याकरीता प्रस्तूत अर्ज अर्जदाराने दाखल केला आहे.

२. सदर प्रकरणात अर्जदाराच्या अर्जाला आक्षेप असल्यास तसे कळविण्याबाबत जाहिरनामा काढण्यात आला. त्याशिवाय दिनांक ०९.०८.२०२३ रोजीच्या दैनिक पुण्यनगरी वर्तमान पत्रात जाहिर नोटीस काढण्यात आला. परंतू प्रकरणात कोणीही आक्षेप किंवा उत्तर दाखल केले नाही.

३. अर्जदाराने त्याचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.०९ दाखल करुन पुराव्यात त्याच्या आधारकार्डची सत्यप्रत (नि.क्र.१२), अनुपलब्धता प्रमाणपत्र (नि.क्र. १३), आक्सापुर हायस्कूल, आक्सपुर यांनी दिलेले शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (नि.क्र.१४), दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रातील दि. ०९.०८.२०२३ रोजीची जाहिर नोटीस (नि.क्र.१५) व त्याबाबतची पावती (नि.क्र.१६) सिध्द केली. अर्जदाराने नि.क्र.

१७ वर पुरसीस दाखल करुन पुरावा बंद केला.

४. उपरोक्त सर्व पुराव्याचे अवलोकन केले असता अर्जदार किशोर नानाजी जुवारे याचा जन्म दिनांक १९/०५/१९८७ रोजी मौजा करंजी येथे झाला हे गृहीत धरण्यास उपलब्ध अर्जदाराचा पुरावा पुरेसा आहे. वरील सर्व बाबींच्या विचाराअंती सदर अर्ज मंजुरीकरीता कुठलीही बाधा आहे असे मला वाटत नाही. म्हणून खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराला याद्वारे निर्देशित करण्यात येत की, किशोर नानाजी जुवारे, रा. करंजी, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर याचा जन्म दिनांक १९/०५/१९८७ रोजी झाला याबाबत नोंद आवश्यक ते विलंब शुल्क आकारुन जन्म-मृत्यू रजिस्टरला घेण्यात यावी.

P.G.Lambe Digitally signed by P.G.Lambe Date: 2023.09.18 17:22:13 +0530

( पी. जी. लंबे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
गोंडपिपरी.

दिनांक १८.०९.२०२३